भाविक रंगभूमी ही एकपेशीय जीवासारखी हवी, अमीबासारखी हवी. एकटे केंद्रही निर्जीव आणि एकटा जीवनरसही निर्जीव प्रोटोलाझम ही निर्जीव. दोघांच्या संयोग होऊन निर्माण झालेला अमीबा मात्र अमर. तो कार्यक्षम असतो म्हणूनच जीवसृष्टीचा विकास पूर्ववत होतो.''

**(भालबा केळकर, ५९ वे संमेलन, दिल्ली)**

घेण्यास आयोजकांना भाग पाडू लागल्या. नानासाहेब भोर, नानासाहेब पोळ, सखाराम भावे, कमलाकर नाडकर्णी, श्री. ज. बापट यांनी आपल्या संपन्न अभिनयाने नाट्यसृष्टीत आपले स्थान निर्माण केले आणि फ्रेंड सर्कलला मानाचे स्थान मिळवून दिले. नाट्यस्पर्धेत त्यांनी पारितोषिके तर मिळवलीच पण व्यावसायिक रंगभूमीही गाजविली. नानासाहेब भोर आणि नानासाहेब पोळ यांनी व्यावसायिक रंगभूमी आणि चित्रपट यातही आपला ठसा-उमटविला. हौशी रंगभूमीवरून व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करून तिथे दीर्घकाळ रंगभूमीची सेवा करणारे आणखी दोन कलाकार कल्याणने दिले. कै. कमलाकर कुलकर्णी आणि सखाराम भावे. नट व नेपथ्यकार म्हणून सखाराम भावे आजही कार्यरत आहेत. या कलाकारांप्रमाणेच नारायणराव मराठे, मालसे, गोविंद खांगटे, देशमुख, वसंतराव फडके हे अन्य गुणी कलावंतही या संस्थेत होते. या संस्थेने दुरिताचे तिमिर जावो, वेड्याचे घर उन्हात, भावबंधन, फास, आंधळ्यांची शाळा आदि नाटके स्पर्धेत सादर केली. या स्पर्धेत 'दुरिताचे तिमिर जावो' यातील पंतांच्या भूमिकेकरितां नानासाहेब पोळ यांना तर 'फास' नाटकासाठी नानासाहेब भोर याना रौप्य पदकाचा सन्मान लाभला.

फ्रेंड सर्कलप्रमाणे दुसरी नावाजलेली संस्था नाट्यविकास त्या काळात कार्यरत होती. या संस्थेची कामगिरीही भरीव होती. या संस्थेने देवमाणूस, संशय कल्लोळ, एकच प्याला, लग्नाची बेडी, सौभद्र, खडाष्टक, अर्थसंभ्रम अशी नाटके सादर केली. राजाभाऊ साठे, विश्वास पटवर्धन, सोनोपंत सरदेशपांडे, बापूराव रानडे असे पट्टीचे गायक नट या संस्थेत होते. त्याचप्रमाणे नाना साठे, डॉ. रायकर, दत्ता पारेकर, भास्कर गोडसे, विष्णुपंत जोग, शामराव भावे, यशवंत शाईवाले असे गद्य नटही होते. कै. डॉ. रायकरांनी व्यावसायिक रंगभूमीवर तसेच चित्रपटांत लहान भूमिका केल्या. राजाभाऊ साठे यांनी आनंद पै यांच्या संस्थेत सौभद्र मधील कृष्णाची भूमिका केली आणि ती गाजली, त्याचप्रमाणे त्यांनी संस्कृत सौभद्र मध्येही तीच भूमिका करून महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या हस्ते सुवर्ण पदक मिळविले. याच संस्थेतील भास्कर गोडसे यांनी 'मी सूर्याची रोहिणी' या व्यावसायिक नाटकाच्या अनेक प्रयोगात काम करून कल्याणबाहेरही आपले नाव गाजविले. विष्णुपंत जोग यांनी 'खडाष्टक' मधील नारोपंत आणि दत्ता पारेकरांनी 'सोन्याचा कळस' मध्ये बिजली अप्रतिम सादर करून आपली अभिनय संपन्नता दाखवून दिली.

कल्याण नागरिकचे प्रवर्तक प.अ.घारे यांनी नागरिक नाट्य मंडळ या संस्थेतून सर्व प्रकारची कामे केली. कल्याणमध्ये एका महिन्यात तेरा प्रयोग करून त्यांनी विक्रम केला. या संस्थेत काकासाहेब बेलवरकर, भाईसाहेब दळवी, लक्ष्मण सुकेणकर, व्ही. एम्. वैद्य, भास्कर गोडसे, गोपाळ काणे, माधव नेने आदि कलावंतांनी कामे केली.

भारत नाट्य मंडळ नांवाची संस्थाही या काळात कार्यरत होती. बेबंदशाही, 'आग्र्याहून सुटका', 'संगीत शारदा' 'म्युनिसिपालिटी', 'पुण्यप्रभाव', आदि नाटके या संस्थेने केली. ऐतिहासिक नाटके हे या संस्थेचे खास वैशिष्ट्य, राम कुंटे, अनंत गोखले, केशवराव सहस्त्रबुद्धे, नारायण गोडबोले आदी सभासद या संस्थेत होते.